**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.**
**E-mail:-** desk11@dte.org.in **Web:-** http://www.dte.org.in

क्रमांक १०/तंशिसं/प्रवेश/२००९/1937-A
दि. 2/7/2009

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, आणि,
विना अनुदानित तंत्रनिकेतने/संस्था.

**विषय :- थेट व्दितीय वर्ष पदविका प्रवेशाबाबत...**
**संदर्भ :- शैक्षणिक वर्ष २००९-१० प्रथम वर्ष प्रवेश नियमावली नियम क्र.२२**

सर्व संबंधित संस्थांना सूचित करण्यात येते की, वरील संदर्भिय नियमांचे अवलोकन करावे, तसेच संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई., व संचालक, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई. यांनी या संदर्भात आतापर्यंत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थेत राबविण्यात येणा-या सर्व पदविका अभ्यासक्रमांना थेट व्दितीय वर्षाला प्रवेश देण्यासाठी संस्था स्तरावर आवश्यक कार्यवाही करावी. या संदर्भात अर्ज भरण्यासाठी किमान ८ दिवसाची मुदत देण्यात यावी. तसेच प्रमुख वर्तमानपत्रामध्ये याबाबतची जाहिरात देऊन पारदर्शक पध्दतीने संस्था स्तरावर गुणवत्ता यादी प्रसिध्द करुन प्रवेश निश्चित करावेत व सर्व प्रवेश प्रक्रिया दिनांक ३० जुलै,२००९ पर्यंत पूर्ण करुन याबाबतची माहिती www.dte.org.in या संकेत स्थळावर अपलोड करावी.

( डॉ. सु.का.महाजन )
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ अमरावती/ नागपूर/ औरंगाबाद - यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.